नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २०५ Issue - 205 | वार गुरूवार दि. १२ डिसेंबर २०२४ Blow- Thursday Date 12 December 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात...




### बिटकॉइनमध्ये गुंतवणूक केल्यास जादा परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक

सोलापूर (प्रतिनिधी) बिटकॉइनमध्ये गुंतवणूक केल्यास जादा परतावा व रक्कम दुप्पट होणार असल्याबाबत व्हिडिओ पाठवून फसवणूक केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.८ नोव्हेंबर २०२२ ते १४ मार्च २०२४ रोजी फिर्यादी यांच्या घरी घडली.याप्रकरणी प्रवीणकुमार सुरेश अकिम (वय-३४,रा.एफ ग्रुप,विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून विवेक बालकृष्ण मिश्रा (रा.माहीत नाही) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे विवेक गोल्डन या यूट्यूब वरील वरील संशयित आरोपीचे व्हिडिओ पाहत असताना विवेक मिश्रा याचा मोबाईल क्रमांक प्राप्त करून फोनवरती बोलणे केले.त्यानंतर वरील संशयित आरोपी याने फिर्यादीस वेळोवेळी फोन करून विविध बिटकॉइन बाबत गुंतवणूक केल्यास जादा परतावा व रक्कम दाम दुप्पट होणार असल्याबाबत फिर्यादीत व्हिडिओ पाठवू लागला. त्यानंतर फिर्यादी यांनी व्हिडिओ पाहून त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून वेळोवेळी गुगल पे,फोन पे वरील रक्कम गुंतवली. त्यावेळी विवेक मिश्रा याने फिर्यादीस दुप्पट परतावा देतो असे खोटे सांगून फिर्यादी यांची रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी परस्पर वापर करून फिर्यादी यांना अद्याप रक्कम पाठवली नाही व कोणताच परतावा दिला नाही. तसेच विवेक मिश्रा याचा दुसरा मोबाईल क्रमांक मिळवून त्याला संपर्क केला असता,तो फिर्यादीस ओळखत नाही, कसले पैसे,हमारेसे पंगा मत लो,नही तो तेरा मोबाईल हॅक करके तेरा व्हिडिओ बनाके बदनामी करेंगे.और तुझे कही मुंह दिखाने जगा नही रहेंगी.पोलीस भी तेरे पीचे पडेगी. अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक खोमणे हे करीत आहे.

# सभापतींना हटवण्यावरून राज्यसभेत गोंधळ

## विरोधकांकडून अनोख्या पद्धतीने निषेध; सभागृहाचे कामकाज स्थगित, विरोधकांकडून मणिपूरचा मुद्दा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : गेल्या दोन आठवड्यापासून दिल्लीत संसदेच्या दोन्ही सभागृहाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या दोन आठवड्याच्या काळात दोन्ही सभागृहांमध्ये सत्ताधारी आणि विरोधक विविध मुद्द्यांवरून गोंधळ घालत आहेत. अशात काल सत्ताधारी व विरोधकांनी घातलेल्या गोंधळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड विरोधकांबरोबर भेदभाव करतात असा आरोप करत इंडिया आघाडीने त्यांच्याविरोधा अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. दरम्यान आजही सभागृहात झालेल्या गोंधळामुळे राज्यसभेचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले आहे. दुसरीकडे लोकसभेतही झालेल्या गोंधळानंतर सभागृहाचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दरम्यान



संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजेजू यांनी आज इंडिया आघाडीने राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांच्याविरोधात आणलेल्या अविश्वास प्रस्तावार टीका केली आहे. शेतकऱ्याचा मुलगा देशाचा उपराष्ट्रपती झाला आहे, हे संपूर्ण देशाने पाहिले आहे. सभापतींच्या प्रतिष्ठेवर जर कोणी हल्ला करत असेल तर तो सहन करणार नसल्याचेही रिजेजू म्हणाले.

दुसरीकडे केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांनीही राज्यसभेत विरोधकांवर टीका केली. नड्डा म्हणाले, आमचे खासदार सोनिया गांधी आणि जॉर्ज सोरोस उठवत आहेत. हा देशाच्या संप्रभुतेचा विषय आहे. सभापतींच्या विरोधा अविश्वास प्रस्ताव आणून देशाच्या संप्रभुतेच्या मुद्यावरून नागरिकांचे लक्ष हटवण्याचा प्रयत्न आहे. सर्वांनी याचा निषेध केला पाहिजे. त्यांनी कधीच सभापतींचा सन्मान केला नाही.

आज इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसद परिसरात अणोख्या पद्धतीने सत्ताधाऱ्यांचा निषेध केला. यावेळी इंडिया आघाडीच्या खासदारांनी तिरंगा ध्वज आणि गुलाबाचे पुष्प देत भाजपाच्या खासदारांचे स्वागत केले. यावेळी विरोधकांनी भाजपाच्या खासदारांना दोन्ही सभागृहाचे कामकाज कामकाज सुरू ठेवण्याचे आणि अदाणींसह इतर सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्याचे आवाहन केले. यावेळी काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वड्रा, काँग्रेस, द्रमुक, झारखंड मुक्ती मोर्चा आणि डाव्या पक्षांचे खासदार तिरंगा आणि गुलाब हातात घेऊन संसदेच्या पायऱ्यांवर उभे होते.

विरोधकांकडून मणिपूरचा मुद्दा

आज लोकसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी मणिपूरमधील परिस्थितीबाबत मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, मणिपूरमध्ये जे काही घडत आहे त्यामुळे लोक त्रस्त आहेत, त्यांना मूलभूत सेवा मिळणे कठिण झाले आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी मणिपूरला कधी भेट देणार आणि गृहमंत्री अमित शहा यांनी या परिस्थितीचा सामना करण्यासाठी काय पाऊले उचलणार आहेत याची सभागृहात माहिती द्यावी. सरकारचे अपयश लपवण्यासाठी भाजपा जॉर्ज सोरोसचा मुद्दा उपस्थित करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी विभागाच्या प्रमुखपदी श्रीकांत परदेशी, चिवटे यांना हटवले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी



मुख्यमंत्री पद सोडल्यानंतर एकनाथ शिंदे यांना पहिला मोठा धक्का बसला. शिंदेंची अत्यंत विश्वासू अशी ओळख असलेले मंगेश चिवटे यांच्याकडून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी विभागाच्या प्रमुख पदी काढून घेण्यात आले आहे. त्यांच्या जागी डॉक्टर

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मोठा धक्का

रामेश्वर नाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

चिवटे यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता पक्षाच्या माध्यमातून राज्यभरातील गरीब व गरजू तरुणांना मोठी मदत केली परिणामी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिमा सुधारली होती मात्र आता शेवटी या पदावरून हटवून नाईक यांची नियुक्ती पत्र मुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव श्रीकांत परदेशी यांनी जारी केली आहे. नाईक यांच्याकडून यापूर्वी उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची जबाबदारी होती.

शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांच्या जनसामान्याचा नेता म्हणून प्रतिमा निर्माण करण्यात मुख्यमंत्री सहायता निधी विभागाचा मोठा वाटा होता शिंदेंनी मुख्यमंत्री सहायता निधीतून अनेक गरजू रुग्णांना गरीब मोफत उपचार केले.चिवटे शेवटी यांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली अंतरवाली सराटी येथील मोरोत जरांगे यांच्या उपोषणाच्या वेळी शेवटी यांनी त्यांची भूमिका बजावली होती व शिंदे यांची निरोप घेऊन शेवटी अनेकदा जाणंगे यांना भेटण्याकडे जायचे.

जरांगिनी उपोषण मागे घेण्यासाठी ज्या वाटाघाटी झाल्या होत्या त्यात चिवटेचा सहभाग होता मात्र आता त्यांच्याकडून मुख्यमंत्री सहायता निधी विभागाचे पद काढून घेण्यात आले आहे हा शिंदे यांच्यासाठी हा मोठा धक्का असलेली चर्चा आहे.

## उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांविरोधात इंडिया आघाडीचा महाभियोग प्रस्ताव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती शेखर कुमार यादव यांनी काही दिवसांपूर्वी विश्व हिंदू परिषदेने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभाग नोंदवला होता. यासह न्यायमूर्तींनी कार्यक्रमात काही वादग्रस्त वक्तव्ये केली होती. यानंतर आता राज्यसभेत इंडिया आघाडी न्यायमूर्ती यादव यांच्याविरुद्ध महाभियोग प्रस्ताव मांडण्यासाठी नोटीस देण्याच्या तयारीत आहेत.

राज्यसभा खासदार आणि वकील कपिल सिब्बल यांनी या प्रकरणी घेतलेल्या पुढाकारानंतर महाभियोग प्रस्तावर विरोधी पक्षांच्या ३६ खासदारांनी आधीच स्वाक्षरी केली असल्याचे सूत्रांनी सांगितले. यावर आणखी खासदारांच्या स्वाक्षऱ्या झाल्यानंतर विरोधी पक्ष गुरुवारी हा महाभियोग प्रस्ताव दाखल करू शकतात. दरम्यान राज्यसभे इंडिया आघाडीचे ८५ खासदार आहेत.

दरम्यान या महाभियोग प्रस्तावावर आतापर्यंत काँग्रेसचे दिग्विजय सिंह, जयराम रमेश आणि विवेक तंखा यांनी स्वाक्षरी केली आहे. आम आदमी पक्षाच्या संजय सिंह, तृणमूल काँग्रेसचे साकेत गोखले, सागरिका घोष, आरजेडीचे मनोज कुमार झा, समाजवादी पक्षाचे जावेद अली खान, सीपीआय(एम) चे जॉन ब्रिटास आणि सीपीआयचे संतोष कुमार यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

गेल्या रविवारी, विश्व हिंदू परिषदेच्या कार्यक्रमात न्यायाधीश शेखर कुमार यादव म्हणाले होते की, देशात राहत असलेल्या बहुसंख्य लोकांच्या इच्छेनुसार हिंदुस्थान चालेल, असे म्हणताना मला कोणताही संकोच वाटत नाही. तसेच ते पुढे असेही म्हणाले होते की, हा कायदा आहे आणि कायदा हा बहुसंख्यांकांनुसार चालतो. ज्याने बहुसंख्यांचे कल्याण तेच मान्य केले जाईल.

न्यायाधीश चौकशी अधिनियम, १९६८ नुसार, एखाद्या न्यायमूर्तींच्या विरोधात लोकसभेत महाभियोग प्रस्ताव दाखल करायचा असल्यास ५० खासदार आणि राज्यसभेत दाखल करायचा असल्यास त्यावर १०० खासदारांच्या स्वाक्षऱ्या असव्या लागतात. हा प्रस्ताव दाखल केल्यानंतर पीठासीन अधिकाऱ्यांना तो स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार असतो. जर स्वीकारला तर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन न्यायाधीश आणि एक न्यायशास्त्रज्ञ यांचा समावेश असलेली तीन सदस्यीय समिती स्थापन केली जाते. ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर महाभियोग प्रक्रिया सुरू होते. संविधानाच्या कलम १२४ (४) नुसार महाभियोग प्रस्वाव मंजूर करण्यासाठी त्या सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने आणि सभागृहात उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी कमीत कमी दोनतृतीयांश सदस्यांच्या बहुमताने पाठिंबा मिळणे आवश्यक असते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपतींची सदिच्छा भेट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी दिल्ली येथे राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची सदिच्छा भेट घेतली.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांचा हा पहिलाच दिल्ली दौरा आहे. आज दिल्लीत आगमन झाल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रपती भवनात जाऊन राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. महाराष्ट्राचे दैवत असलेल्या विठ्ठल-रुख्मिणीची मूर्ती देऊन त्यांचा आदर-सत्कार केला आणि त्यांचे आशिर्वाद घेतले.

त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे थेट उपराष्ट्रपती श्री जगदीप धनखड यांच्या निवासस्थानी गेले. तेथे त्यांना विठ्ठल-रुख्मिणीची मूर्ती देऊन उपराष्ट्रपती महोदयांचा सत्कार केला आणि त्यांचे आशिर्वाद घेतले.

राज्यात उडाली खळबळ

सातारा लाचलुचपतची मोठी कारवाई

# लाच घेताना न्यायाधीशालाच पकडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा : आपल्यावरील अन्याय किंवा अत्याचारविरुद्ध दाद मागण्याचे अंतिम ठिकाण म्हणजे न्यायालय. लोकशाही प्रक्रियेत न्यायालय ही स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात असल्याने प्रशासन आणि राजकीय दबाव यांच्याविरुद्धची लढाई देखील मोठ्या आशेने न्यायालयात लढली जाते. मात्र चक्क न्यायाधीश महोदयांनाच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याने राज्यात खळबळ उडाली आहे.



साताऱ्यातील एका हॉटेलमध्ये सापळा रचून न्यायाधीश महोदयांना पोलिसांनी रंगेहात पकडले. त्यानंतर, गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील प्रक्रिया सुरू आहे. विशेष म्हणजे न्यायालयाच्या आवारातच ही घटना घडली आहे. त्यामुळे, सर्वसामान्यांच्या न्याय-हक्काचं शेवटचं आश्वासक ठिकाण असलेल्या न्यायपालिकेवरील विश्वासाला देखील या घटनेनं तडा गेला आहे.

पुणे-सातारा अँटी करप्शन विभागाने संयुक्तिकपणे सार्तांयात मोठी कारवाई केली आहे. सातारा जिल्हा न्यायालयातील न्यायाधीश महोदयांविरुद्धच गुन्हा दाखल झाला आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश धनंजय निकम यांच्यासह तिघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले, त्यानंतर गुन्हा दाखल करुन पुढील कारवाई सुरू हे. पाच लाख रुपयांच्या लाच प्रकरणात न्यायाधीश महोदयांसह तीघांना रंगेहात पकडल्याने न्यायपालिका क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

फिर्यादीच्या वडिलांना जामिन देण्यासाठी पाच लाखांची मागणी करण्यात आली होती, अशी प्राथमिक माहिती आहे. विशेष म्हणजे जिल्हा सत्र न्यायालयाच्या आवारातच या घडामोडी घडल्या आहेत.

येथील एका हॉटेलमध्ये सापळा रचून अँटीकरप्शनच्या पोलिसांनी सर्वांना रंगेहात पकडले, त्यानंतर कायदेशीर प्रक्रियेद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या घटनेने सातारा जिल्ह्यासह राज्यभरात खळबळ उडाली आहे. ज्या न्यायव्यवस्थेवर सामान्य माणसांचा शेवटचा विश्वास असतो, त्याच न्यायव्यवस्थेवरही या कारवाईनंतर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास हा न्यायपालिकेवर आहे, पोलिस यंत्रणांकडून अन्याय झाला तरी न्यायालयात आपणास दाद मिळेल, न्यायाधीशांच्या खुर्चीवर बसलेल्या न्यायमूर्तींकडून आपल्यावरील अन्याय दूर होईल, अशी सर्वसाधारण भावना असते. मात्र, चक्क न्यायाधीश महोदयच लाच घेताना आढळून आल्याने विश्वास कुणावर ठेवायचा असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. पोलीस, व प्रशासनातील भ्रष्टाचाराच्या घटना सातत्याने समोर आल्या आहेत. पण, थेट न्यायपालिकेतील वरिष्ठ अधिकारीच अडकल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

## नामसाधर्म्याचा फायदा घेऊन बनावट कुलमुखत्यारपत्राद्वारे फसवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : नामसाधर्म्याचा गैरफायदा घेऊन मोठ्या भावाची बनावट सही करून मिळकतीचे कुलमुखत्यारपत्र दुसऱ्याला देऊन फसवणूक केल्याप्रकरणी एका गृहनिर्माण संस्थेच्या मुख्य प्रवर्तकासह दोघाजणांविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यासंदर्भात रफिक गफूर शेख (वय ५८, रा. देशमुख प्लॉट, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार हा फसवणुकीचा प्रकार ३० जून १९९७ ते ३ मे २०२३ या कालावधीत सोलापुरात दुय्यम निबंधक कार्यालयात घडला. याप्रकरणी नरसय्या रामदास इप्पाकायल आणि नरसिमलू यल्लप्पा कोंडा अशी गुन्हा दाखल झालेल्या दोघांची नावे आहेत.

प्रियदर्शनी गृहनिर्माण सहकारी संस्थेचे मुख्य प्रवर्तक असलेल्या नरसय्या इप्पाकायल व त्यांचे थोरले बंधू नरसय्या रामदास इप्पाकायल यांच्यात नामसाधर्म्य आहे. त्याचा गैरफायदा घेऊन धाकट्या नरसय्या इप्पाकायल याने थोरल्या नरसय्या इप्पाकायल यांची बनावट सही करून नरसिमलू कोंडा यांना कुलमखत्यारपत्र लिहून दिले. या खोट्या कुलमुखत्यारपत्राच्या आधारे प्रियदर्शनी गृहनिर्माण संस्थेचे मुख्य प्रवर्तक तोतया व्यक्तीने दुसऱ्या आरोपीच्या मदतीने दुय्यम निबंधक कार्यालयात मिळकतीची दस्त नोंदणी केली. यात शासनाची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



संपादकीय....

## विरोधक आक्रमक

इंडिया आघाडीच्या खासदारांनी संसद परिसरात अणोख्या पद्धतीने सत्ताधाऱ्यांचा निषेध केला. यावेळी इंडिया आघाडीच्या खासदारांनी तिरंगा ध्वज आणि गुलाबाचे पुष्प देत भाजपाच्या खासदारांचे स्वागत केले. यावेळी विरोधकांनी भाजपाच्या खासदारांना दोन्ही सभागृहाचे कामकाज कामकाज सुरू ठेवण्याचे आणि अदाणींसह इतर सर्व मुद्द्यांवर चर्चा करण्याचे आवाहन केले. यावेळी काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वड्रा, काँग्रेस, द्रमुक, झारखंड मुक्ती मोर्चा आणि डाव्या पक्षांचे खासदार तिरंगा आणि गुलाब हातात घेऊन संसदेच्या पायऱ्यांवर उभे होते. लोकसभेचे कामकाज सुरू झाल्यानंतर काँग्रेसचे खासदार गौरव गोगोई यांनी मणिपूरमधील परिस्थितीबाबत मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, मणिपूरमध्ये जे काही घडत आहे त्यामुळे लोक त्रस्त आहेत, त्यांना मूलभूत सेवा मिळणे कठिण झाले आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी मणिपूरला कधी भेट देणार आणि गृहमंत्री अमित शहा यांनी या परिस्थितीचा सामना करण्यासाठी काय पाऊले उचलणार आहेत याची सभागृहात माहिती द्यावी. सरकारचे अपयश लपवण्यासाठी भाजपा जॉर्ज सोरोसचा मुद्दा उपस्थित करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. गेल्या दोन आठवड्यापासून दिल्लीत संसदेच्या दोन्ही सभागृहाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या दोन आठवड्याच्या काळात दोन्ही सभागृहांमध्ये सत्ताधारी आणि विरोधक विविध मुद्द्यांवरून गोंधळ घालत आहेत. अशात काल सत्ताधारी व विरोधकांनी घातलेल्या गोंधळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड विरोधकांबरोबर भेदभाव करतात असा आरोप करत इंडिया आघाडीने त्यांच्याविरोधा अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे.

## वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाई; ४२६ रिक्षा जप्त

मुंबई : मुंबईत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांविरोधात मुंबई पोलिसांनी विशेष मोहीम राबवली असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाई करण्यात आली. त्यात ४२६ रिक्षा पोलिसांना जप्त केल्या.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांना जरब बसवण्यासाठी मुंबई पोलिसांनी २९ नोव्हेंबरपासून विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिम अंतर्गत विनापरवाना, विना गणवेश, विना बॅच, विना अनज्ञप्ती रिक्षा चालविणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. तसेच, कार्यक्षमता प्रमाणपत्र नसणे, नियमापेक्षा अधिक प्रवाशांना रिक्षात बसविणे, वाहनतळाबाहेर रिक्षा उभे करणे, अवैधरित्या प्रवाशांना बोलाविणे, भाडे नाकारणे आदी एकूण २०९९ वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला. या कारवाईतून एकूण ४२६ रिक्षा जप्त करण्यात आल्या. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. नियमांचे उल्लंघन करणारे रिक्षा चालक आढळल्यास पोलीस दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाकडे तक्रार दाखल करण्यासाठी १००, १०३, ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातर्फे करण्यात आले आहे.

## राज्यातील शासनमान्य ग्रंथालयाच्या ४० टक्के अनुदान वाढीचा निर्णय घ्यावा : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे कुलकर्णी यांची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : राज्यातील शासनाच्या सार्वजनिक ग्रंथालयाच्या ४०% अनुदान वाढीचा निर्णय तातडीने घेऊन ग्रंथालय कर्मचाऱ्यांना दिलासा देण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव महेश कुलकर्णी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. महेश कुलकर्णी यांनी पवार यांची मुंबईत भेट घेऊन उपमुख्यमंत्री पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार केला. त्यानंतर त्यांनी आपल्या मागण्याची निवेदन अजित पवार यांच्याकडे देऊन ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांना साखळी घातली व राज्यात ११ ००० शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालय आहेत या ग्रंथालयामध्ये जवळपास २०००० कर्मचारी तुटपुंज मानधनावर काय करीत आहेत असून त्याच्या कुटुंबाची उपजीविका भागवण्याचा इतपत सुद्धा त्यांना मानधन मिळत नाही आर्थिक परिस्थिती बिकट असूनही अशा परिस्थितीत राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील २०००० कर्मचारी ग्रंथालयामध्ये काम करत आहेत त्यामुळे ग्रंथालय जे अनुदान वाढ करून दर्जाबद्दल नवीन ग्रंथालय मान्यता देणे व केंद्र शासनाच्या निधी प्रत्येक ग्रंथालयास देण्यासंदर्भात प्रस्तावासही मंजुरी मिळावी तसेच राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालय ४०% अनुदान वाढीचा निर्णय तातडीने घेणे तेव्हा याबाबत कुलकर्णी यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी सविस्तर चर्चा केली व यावेळी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दडपशाहीतील साक्षी पत्रकारिता : उद्याचे गुन्हेगार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

व्यक्तीचे जगणे हे समाज जीवनातील एक महत्त्वाचे जैविक वर्तन असते. व्यक्तीला समाज जगण्यास उपयुक्त सर्व प्रकारचे सहाय्यक करत राहील. असा व्यक्तीचा आशावाद सतत असतो पण समाज आणि व्यक्ती यांच्या नात्याची ही अपूर्ण रेषा अशीच जीवनभर मोठी करावयाचे असते .असे दोन्ही पातळीवर गृहीत धरून वर्तन चालू असते .समाज व्यक्तीचे जीवन त्याची जीवनरेषा नेहमी कमी करत असतो. तर व्यक्ती समाज जीवनाची विशाल वर्तुळे विकसित करण्यासाठी कमी-जास्त प्रयत्न करीत असतो. हे व्यक्ती आणि समाज जीवनाचे (प्रत्येकाच्या जीवनाची संघर्ष गाथा) वर्तुळ, रेषावर्तन आज आपण समजावून घेण्याचा इथे प्रयत्न करीत आहोत.

वर्तुळे ही विस्तारतात पण ती संकीर्ण असतात .ती लघु होत राहतात .ती स्वयं निर्बंध आणि सीमित रेषा घालून घेतात त्यातूनच वर्तुळांचा सिमित अर्थ आणि सीमित वर्तन त्यांचे चालू राहते. या समाज वर्तनाच्या वर्तुळाला अनेक कारणे आहेत. सम काल हा व्यक्ती सतत पाठीमागे टाकते आणि स्वतःच्या जीवनात घडलेल्या असंख्य प्रकारच्या घटना विसरणे योग्य आहे. असे म्हणत समजत त्या दुर्लक्षित केल्या जातात, आणि एक दडपशाहीचा इतिहास आपणच मुक इतिहास बनवत असतो. आपण मूक इतिहासाचे साक्षीदार बनतो .ही प्रक्रिया होते. कशी हे खूप समजून घेणे महत्त्वाचे आहे व्यक्ती जगत असताना तिच्या वाट्याला येणारा अन्याय अपेक्षा अत्याचार फसवणूक शोषण आणि त्याला उपेक्षित ठेवण्यासाठी केलेला व्यापक प्रयत्न असे असंख्य प्रकारचे वर्तन प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत समाज जीवनात घडून आलेले असते. एक व्यक्ती हा एक इतिहास असतो एक व्यक्ती हा प्रवृत्तींचा झगडा असतो. एक व्यक्ती मूल्य संघर्षाची वाटचाल असते. एक व्यक्ती शोषित म्हणून परिमान आणि एकक म्हणून पाहता येते. आज इथेच तोच प्रयत्न माध्यमातील घटक या नात्याने करण्याचा प्रयत्न केला.

प्रस्तुत कार्यकर्ता प्रतिनिधींनी माध्यमात काम करण्याची साक्षरता सहज आपसूक प्राप्त केली नाही, तर ठरवून माध्यमांचे महत्त्व माध्यमाची हस्तक्षेपी भूमिका आणि समाज जीवनावरील माध्यमाचा प्रभाव हा मुद्रित माध्यमाचा प्रभाव समजावून घेऊन ८० च्या दशकात काही अक्षरे गिरवणारा हा वृत्त प्रतिनिधी बातमीदार ते शोधक पत्रकार ते विश्लेषण कार्य पत्रकार अशा विविध भूमिकात कसा रूपांतरित झाला? त्याचा हा शोध घेण्याचा प्रयत्न आहे .विचार हे आकर्षण असते.. विचारस्तुत्य असतात .चांगल्या विचाराची प्रियता हे आपल्या जीवनाचा आनंद असतो. त्यासाठी चांगले विचार जिथे कुठे मांडले जातात. तिकडे पावले ओळत राहतात .हीच पावले जीवन वाटा घडवतात. आपल्या पावलांची दिशा हीच आपल्या जीवनाची दिशा असते. असे व्यक्तीला जेव्हा प्रतीत होते. तेव्हा जीवनाचा ध्येयवाद जीवनाची विचारसरणी ही आपणाला ठरवण्याला मदत होते. इतके सर्व काही कळतेच असे नाही .पण चांगल्या गोष्टीचे चांगले विचार असे चांगल्या सार्वजनिक जीवनातल्या महत्त्वपूर्ण आधाराच्या गोष्टी घटना यामध्ये आपल्याला समजले पाहिजे. सहभागी झाले पाहिजे असे वाटत राहणे ही सुद्धा व्यक्तीच्या परिवर्तनाचीच सुरुवात असते.

८० च्या दशकात असे विद्यार्थी उत्तर कालखंडातील जीवन सुरू झाले आणि व्याख्याने शिबिरे परिसंवाद चर्चासत्रे कार्यशाळा यांच्या मधून सतत विचाराच्या चर्चा विश्वास आपण राहावे .त्यात समाविष्ट व्हावे असे आंतरिक ओढ होती आणि ही ओढच जीवन आला परिमाण प्राप्त करून गेली आहे म्हणून या विचार चर्चा विश्वाचे आंतरिकआसक्तीचे वर्तन असते काय? हा प्रश्न स्वतःला विचारण्याचा इथे प्रयत्न केला.

वर्तमान घडत नाही. अशी रडगाणी जाणारा समाज सभोवताली खूप मोठ्या व्यापक विस्तृत प्रमाणात आहे. पण या समाजाला स्वयंजीवनातल्या वर्तनाची अनुभूती असूनही तो त्या भूमिका सांगत नाही. मांडत नाही, आणि वाट्याला आलेल्या सार्वत्रिक दुःखाचा पंचनामाही करत नाही. इतकी भीती त्याच्या व्यक्तिमत्त्वात दाटून राहिलेले असते प्रस्तुत कार्यकर्ता विद्यार्थी दशेपासून सामाजिक विषमता महिला अत्याचार दलितांचे शोषण एकूण विषमतेचे व्यापक सूक्ष्म वर्तन समजून घेत पुढे जात राहिला ,आणि त्यातूनच समकाळातील परिवर्तनाचा विचार जो करुनेच्या अनुकंपाच्या स्वरूपात होता त्याच्या आकर्षण वाटत होते ,पण सम काळातील या दाहक दुःखाची साठत गेली माहिती हीच कृतिशीलता घडवण्यासाठी ऊर्जा म्हणून उपयुक्त ठरत गेली . प्रत्येक कार्यकर्ता हा दाहक अनुभव परिस्थितीचे दुःखाचे अनेक प्रसंग सार्वजनिक जीवनातील चाललेल्याअत्याचार घटनांमुळे संवेदनेवर होत असलेला आघात पाहत असतो. हे सगळे वाढत जाते . इथेच लढले पाहिजे इथेच दडपशाही विरुद्ध बोललेच पाहिजे. इथेच सरमजाम शाहीला आव्हान दिले पाहिजे. आपण छोटे आहोत. व्यवस्था मोठी आहे पण व्यवस्थित ही अत्याचाराची माहिती हिचा पंचनामा केला पाहिजे. हा र हिम्मतपरस्थित कार्यकर्ता नुसता विद्यार्थी नव्हता तर तो सभोवतालच्या घटनेचा साक्षीदार आणि निरीक्षक होता आणि आजही आहे .आपण पाहिलेल्या घटना या दुःखदायक आहेत .या घटनांचा अर्थ लावला पाहिजे. यांची कारणे शोधले पाहिजे या घटना घडवणाऱ्या व्यक्ती आपप्रवृत्ती विरुद्ध लढले पाहिजे याच जाणिवेतून खुनाच्या घटना, तडीपारीच्या घटना, दलिता अत्याचाराच्या घटना, दलितांच्या जमिनी गिळंकृत करण्याच्या घटना, आणि तसेच जाती अधिष्ठित संकीर्ण जीवन हे कळत होते आणि त्यातूनच आपल्या जीवनाचा संघर्ष हा पण टोकाला नेला पाहिजे. हे कळत होते. त्यातूनच बांधिलकी आणि संघर्ष बांधिलकीची थोडी जपता येणारे निष्ठा आणि सभोवतालच्या प्रश्नाबद्दलचा संघर्ष करण्याची अपरिहार्य अंतरिक तीव्रता हीच कार्यकर्त्याला घडवते. तसेच काहीसे इथे घडले आहे ,पण कार्यकर्ता ते बातमीदार बातमीदार ते पत्रकार पत्रकार ते शोधक पत्रकार आणि शोधक पत्रकार ते विश्लेषणकारी पत्रकारिता करणारा अभ्यासक हा प्रवास खूप आनंदही आहे कटुता संघर्षाच्या समयि मोडून पडण्याचे प्रसंग या सर्वांचे आश्चर्य वाटते .या सर्व तब्बल चार दशकांच्या प्रवासात किती मोठ्या व्यक्तींच्या सहवासात त्यांचा मूल्य वर्तन व्हावं स्वीकारण्याची आधिरता बाळगता आली संघर्ष शिवाय नवनिर्माण नाही संघर्ष ही व्यवस्थेची गरज असते मूक आवाज शक्ती मध्ये रूपांतरित होत नाहीत. त्यासाठी व्यवस्थेच्या असंख्य दोष सतत मांडले पाहिजेत, आणि म्हणूनच लिहित्या काळात लिहिलेले अनेक प्रसंग इथे नमूद करणे महत्त्वाचे वाटते वर्णनात्मक लेखन आणि शोधक लेखन तपशीलवार लेखन आणि वार्तांकन अशा अनेक न करणाऱ्या शैलीच्या वृत्तपत्रे जगतातून पुढे जात उजागर पत्रकारिता परदा फास् पर पत्रकारिता व्यवस्थेला जाब विचारणारी पत्रकारिता करण्याचा प्रवास हा सहज धैर्यातून घडत गेला .

आपल्या सभोवताली घडणारा अन्याय हा करणारी व्यक्ती संस्था अधिकारी कोणताही असो तो व्यवस्थेचा गुन्हेगार आहे. म्हणून त्याला समाजाच्या पुढे उभा करणे हे आपले काम आहे, आणि त्यासाठी धैर्याची गरज आहे हितसंबंधांचा विचार करणे नाही ही मानसिकता तयार झाल्यामुळेच दीर्घकाळ कितीतरी प्रश्नांना वाचा फोडता आलेली आहे .जे प्रश्न भल्याभल्यांना हातात घेणे शक्य झाले नाही. ते राज्यस्तरीय पातळीवर प्रश्न पोहोचवता आलेआहेत. सभोवतालच्या समाजाचे क्रूर चेहरे अत्याचारी वर्तन शोषणाचे त्यांचे कराल जबडे उघडे करून दाखवत आले आहेत. याच्यासारखा पत्रकारितेतील आनंद नाही. खुशबू पत्रकारिता ,चमको पत्रकारिता ,लाचार पत्रकारिता आणि(अपवाद असलेल्या क्षमा मागून) पाकीट पत्रकारिता या सर्वांच्या पासून दूर राहून अर्धवेळ का असेना ?? परंतु कहय्यात न जाणारी जो कोणी (आपण) पत्रकारिता करतो तो एक समकाळाचा इतिहास स्वतः शब्दबद्ध करत असतो. याची जाणीव आहे. उदा....

साताऱ्यातील डब्ल्यू बँक इसाप घोटाळा .महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ठेकेदार घोटाळा . सैनिक बँक जमीन घोटाळा .कार्यशाळा पाटबंधारे मंडळ साहित्य खरेदी घोटाळा. महाबळेश्वर जमीनलिज घोटाळा. जिल्हाधिकाऱ्यांच्या जातीचे प्रमाणपत्र घोटाळा. सरकारी गोदामातील धान्य विक्री घोटाळा .जिल्हा



नियोजन विकास समितीचा ऑडिट घोटाळा. जिल्हा परिषदेचा औषध घोटाळा. जिल्हा परिषदेचा पाणीपुरवठा हातपंप घोटाळा .जिल्हा परिषदेचा गवती छप्पर समाज कल्याण घोटाळा .जिल्हा परिषदेचा बिअर फुट डॉक्टर प्रमाणपत्र घोटाळा. जिल्हा प्रौढ साक्षरता विभागाचा पेटी तबला घोटाळा .जिल्हा भूविज्ञान विभागाचा वाळू प्रभाग व भूगर्भपाणी पातळी मापन घोटाळा. जिल्हा खणी कर्म विभागाचा खोट्या पावत्या वाळू घोटाळा. जिल्हाधिकाऱ्यांच्या व ठेकेदारांच्या संयुक्त वाळू लिलावाचा घोटाळा .सातारा जिल्ह्यातील रोजगार हमी खटाव व मान तालुका मस्टर तपासणी घोटाळा. सातारा जिल्ह्यातील वनीकरण विभागातील नरक्या तस्करी घोटाळा .सातारा जिल्ह्यातील आरा गिरण्या परमिशन घोटाळा. सातारा जिल्ह्यातील ११४ पोलीस भरतीचा लेखी परीक्षा घोटाळा .सातारा जिल्हा पोलीस दलाचा पोलीस इमारत बांधकाम घोटाळा. . सातारा जिल्हा शल्य चिकित्सा विभागाचा स्विय प्रपंची ऑडिट घोटाळा. माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्या विभागातील नोकर भरती मान्यता पत्र विक्री घोटाळा .महाराष्ट्र पातळीवरील अनुशेष उल्लंघन करून ४११ १बोगस मान्यता दिलेलां

घोटाळा .सातारा जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाने बोगस घरकुल योजना खटाव व कोरेगाव तालुक्यात राबवल्या त्याच्या अनुदान हडप प्रकरणातील भांडाफोड. समाज कल्याण विभागातील आश्रम शाळांच्या बोगस विद्यार्थ्यांच्या अनुदान वाटप व हप्ते गोळा प्रकरण पर्दाफाश. सिटी सर्वे विभागातील सर्व रेकॉर्ड घरी घेऊन जाणाऱ्या बिल्डरचा कारनामा उगड करणारी पत्रकारिता करता आली.

सरकारी भूखंडाचे कागदपत्रे बदलून भुखड गिळंकृत दोन भूखंड गिळंकृत टोळी भूखंड घोटाळ्याचे वार्तांकन पीडब्ल्यूडी जागा, मरी आईकॉम्प्लेक्स घोटाळा व अमेरिकन मिशन चर्च जमीन घोटाळा.फोडजाई मंदिर स्थानांतर व जागा गिळंकृत संयुक्त प्रकरण , जिल्हा न्यायालय सत्यनारायण प्रकरण

पाचगणी पेट्रोल पंप इकबाल मिरची प्रकरण, मांढरदेवी दुर्घटना प्रकरण, सरकारी रुग्णालयातून चाललेली अर्भक चोरी प्रकरण ,युनायटेड वेस्टर्न बँक ट्रस्टी कंपनी शेअर्स घोटाळा, समर्थ समर्थ सेवा मंडळ ट्रस्ट व सज्जनगड देवस्थान ट्रस्ट दानपेटी व जमीन घोटाळा, प्रकरण कैलास भूमी बांधकाम व निधी संकलन लॉटरी घोटाळा .कार्यकारी अभियंता धोम पाटबंधारे मंडळ गुंजाळ व खासदार खंडणी प्रकरण, शरद लेवे खून प्रकरण यासारख्या असंख्य घटनांचे निव्वळ वार्तांकन नाही तर घटनांचे मूळ शोधून काढणारी छोटी मोठी पत्रकारिता केल्याने ही बातमीदारीच्या पलीकडे आनंद देऊनगेली आहे . ती सातारा जिल्ह्याच्या इतिहासाची पत्रकारितेची साक्षीदार ठरली आहे तो ऐवज अभ्यासाचा पुढे उपलब्ध झाला आहे.

घटना वार्तांकन आणि दैनंदिन असंख्य विषयाच्या प्रसंगाच्या बातम्या यांच्या पलीकडे जाऊन व्यापक समाज जीवनच्या दुष्ट वर्तनाचे गुन्हेगार हे उघड करणे .हे जेव्हा प्रतीत झाले तेव्हापासून ची समाज जीवनातील आपली जबाबदारी ही एक दडपशाहीच्या अत्याचाराच्या कालखंडातील इतिहासाचा साक्षीदार असे आहे आणि म्हणून समग्र घडणार्या घटना हा उद्याचा अत्याचारी इतिहास असतो, आणि म्हणून तो नेहमी मूकपणे न पाहता तो समाज मनाच्या पुढे मांडणे. आपली जबाबदारी आहे ,आणि त्यासाठी अथक कष्ट अथक धैर्य बाळगून अत्यंत उपेक्षा आणि अपेक्षा या दोन्हीही काही न बाळगता फक्त पुढे जात राहणे .हेच आपल्या सम काळातील घटनांच्या इतिहास बद्ध करण्याच्या पत्रकारितेला आपण जागलो आहोत. हा मूक आवाज आपण बुलंद करत आहोत. निष्पक्ष आणि निर्भय वार्तांकराची ही जबाबदारी ऐतिहासिक म्हणून आपण पुढे नेत आहोत. याचेही आंतरिक खूप समाधान होते आहे.

अत्याचार निर्मूलन ही आकाशातून घडणारी गोष्ट नाही. न्यायाची प्रस्थापना ही न्यायाच्या तराजूतून होणार नाही. सामान्य माणसांचा बुलंद आवाज स्पीकर मुळे तयार होणार नाही .व्यवस्थेला शरण जाणे नाही. ही स्वायत्त निर्भय वृत्ती ही पुस्तकातून प्राप्त होणार नाही. स्वयंशूद्र स्वार्थांना सतत लाथ मारली पाहिजे. हे स्वतःसाठी वर्तन करता आले पाहिजे. हे सर्व काही पैलू या लेखन प्रवासात आपणाला प्राप्त करता आले पाडता आले हीच गोष्ट एका सामान्य माणसाचा छोट्या इतिहासाची मोठी गोष्ट असते. हे ही समजत होते.हा समाजाच्या व्यापक इतिहासाचा एक पुरावा असतो. समाजाचा व्यापक इतिहास अभ्यासण्यासाठी समकाळातील अशा व्यक्तींनी घटनांची मांडणी करणाऱ्या संस्था लेखन हे आधारभूत धरले जाते, किंबहुना भविष्यातील अभ्यासकांना समाज विश्लेषकांना भवताला मध्ये काय घडले ?इथे कोणी चुका केल्या ?याचे गुन्हेगार कोण आहेत? या प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी आपण इतिहासाचे सम काळाचे चार दशकांचे साक्षीदार सामाजिक राजकीय आर्थिक व गुन्हेगारीच्या क्षेत्राचे होतो आणि आहे त्यामध्ये आपण आपली वृत्तस्त भूमिका बजावली आहे कृतिशील राहुल प्रश्नांना वाचता फोडली आहे .यातून न्यायाची प्रक्रिया कितपत झाली हे कळत नाही परंतु अत्याचारी आणि दडपशाहीची प्रवृत्ती समकाळात आपणाला रोखता आली म्हणून आपण रोखली. हे वर्तन सुद्धा व्यक्ती जीवनाला बांधिलकीचे छोटे समाधान प्राप्त करून देते. प्रत्येक व्यक्ती ही दडपसर यांनी अत्याचाराला बळी जाते आव्हान देत नाही संघर्षाला सिद्ध होत नाही. त्यातूनच व्यवस्था उध्वस्त होत राहतात भारतीय पत्रकारिता ही जाती अधिष्ठित कालही होती आणि आजही आहे भारतीय पत्रकारिता भाटशाही ते पाठाशाही अशी प्रवास करत पुढे चालली आहे.

गुन्हेगारांच्या सोबत मंत्र्यांच्या दारातील श्वापदे होत भारतीय पत्रकारिता ही डुक धरून आज पुढे चालली आहे .ती वर्णने आणि रंजन प्रतिमा मंडन करीत समाज जीवनाचे फसवणूक करत आहे इतिहास हे पाहतो आहे. भविष्य याची चिकित्सा करणार आहे.

पत्रकारिता राजकीय पक्षांची बटीक बनत चालली आहे अधिकाऱ्यांची बोली लावणारी बोली आहे. जातीच्या आणि जातीच्या अंतर्गत चाललेली गुन्हेगारी दडपण्याचा ती प्रयत्न करते आहे .स्वयम पक्ष स्वयं नेता स्वयं जात सोडून जगातल्या सर्वांना ती गुन्हेगार ठरवत आहे आणि स्वयंवर्तनाचा पारदर्शकतेचा आरसा दाखवत ती फिरत आहे स्वतःच्या वर्तनाला सुद्धा एक इतिहास असतो. ते पण अपारदर्शक वर्तन असते समाजाला ते माहीत असते समाज हे मूकपणे वर्तन करतो सहन करतो. मात्र समकाळातील दुष्ट प्रवृत्ती आणि गुन्हेगार हे समजावून घेत असतो मात्र मूक समाज हाच दडपशाहीचा निर्माता असतो मूक समाज निर्माण का होतो? भयग्रस्त समाज निर्माण का होतो? या प्रश्नांची उत्तरे पत्रेकरिता देत नाही

माध्यमांच्याकडून दृकश्राव्य माध्यमांकडे निघालेले पत्रकारिता त्याही पलीकडे व्यक्ती विश्वासार्तेकडे निघाली आहे माध्यमांच्या भुलभुलय्यात वाचक एक दशक हसले पण सर्वच भाषेतील वाचक हे विश्वासाहर तेच्या निष्पक्ष निर्भय पत्रकारितेच्या अपेक्षांनी पुढे जात आहेत.

हिंदुत्वाचा नवफासी वाद हा कार्पोरेट करप्शन च्या आधारे पुढे येतो आहे कार्पोरेट करप्शन हा नवा फासी वाद रुजवतो आहे. जगातील पाचवी अर्थसत्ता स्थिर देश सेफ देश असे फसवत कार्पोरेट करप्शन हीच नव फाशीवादाचे निर्माते बनत आहेत माध्यमे आपले सार्वभौमत्व आणि अभिव्यक्ती विकत रोज पुढे चालले आहेत अस्थिर न्यूनगंडग्रस्त आणि अत्याचाराच्या काळजीने ग्रासलेला समाज हे सगळे पाहतो आहे. समजावून घेतो आहे .इतिहासाचे हे समकाळातील गुन्हेगार सभोवतालच्या प्रत्येक व्यक्तीला माहित आहेत फक्त त्यांची व्यापक कपटनीती यशस्वी होते आहे आणि म्हणून दडपशाहीचा गुन्हेगार हा बहुसंख्यांक माध्यमातील व्यक्ती आणि प्रवृत्ती झाली असल्या तरी त्यांना समाज मनाच्या अंतरंगात स्थान भविष्याचा असणार नाही समाज नित्य घटना नित्य गुन्हेगारी नित्य अत्याचार नित्य भ्रष्टाचार समजावून घेत असतो त्यात सहभागीही होतअसतो .मात्र या सर्वांच्या विरुद्ध लढणारा एक असंतोषी मनाचा लाव्हारस त्याचवेळी समाजात तयार होत असतो. हे समाज विसरतो आणि म्हणूनच लोकशाहीचा प्रवास दडपशाहीकडे, दडपशाही कडून नव फासी वादाकडे तेथून तो कार्पोरेट फासिवादाकडे होत राहणार आहे भारतीय नवफासी वाद हा वर्ण वाद आहे आर्यवाद आहे .. वंशवाद आहे. रक्त वाद आहे त्यामुळे या सर्वांना चिकित्सेच्या चौकात सतत उभे केले पाहिजे आणि तारकांच्या पिंजऱ्यात उभे करून त्यांना समाज मनाचे गुन्हेगार म्हणून निर्धारित केले पाहिजे. हे एका छोट्या कार्यकर्त्याचे निर्धारित निर्भय वर्तन गुन्हेगारांना निर्धारित करत गेले आणि इतिहासाचा मोठा साक्षीदार म्हणून सम काळात ते अर्थपूर्ण ठरले एवढेच आपल्या लेखन शैलीचे वृत्तस्त पत्रकारितेचे पैलू आहेत तो गुणधर्म आहे ते वर्तन आहे ते कर्तव्य आहे असे वाटून राहते दडपशाहीचा इतिहास का पत्रकार झालो नाही हे यातूनच स्वयंप्रतीत होते म्हणून इथे ते सर्व शब्दांमध्ये केले आहे .कोणताच कालखंड हा आदर्श राहू नये .अशी व्यवस्था नवा फाशीवादाची तयार झाली आहे अशा कालखंडात चिकित्सा कारण शोध अन्यायाची मूळ घटक ही सर्व मांडणारी भविष्यवेधी पत्रकारिता जर निर्माण झाली नाही तर दडपशाही क डून लोकशाहीच्या अंकाकडे पत्रकारितेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अंधकार मय कालखंडातून आपण पुढे चाललो आहोत. एवढेच मनोमनी समजावून घेणे रास्त ठरते.

**लेखक : शिवाजी सोनुबाई पांडुरंग राऊत , सातारा**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### जिल्ह्यातील कारखानदारांनी ऊस दर जाहीर करण्याची मागणी

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील यंदाच्या हंगामात सर्व कारखाने चालू होऊन जवळजवळ तीन आठवडे झाले आहेत मात्र जिल्ह्यातील दोन साखर कारखान्यांचा अपवाद वगळता इतर सर्व कारखान्यांनी अद्यापही ऊस दर जाहीर केला नाही. तो तातडीने जाहीर करावा, अशी मागणी शेतकरी राघवेंद्र बिराजदार यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

गळीत हंगाम सुरू झाला आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूरचा विठ्ठल साखर कारखाना आणि माढा येथील कारखान्याने ॲडव्हान्स ३५०० रुपये दर जाहीर केला आहे. याव्यतिरिक्त इतर कारखान्यांनी अद्याप दर जाहीर केला नाही. एफआरपी कायद्यानुसार १४ दिवसाच्या आत गाळप झालेल्या उसाचे दर दिले पाहिजे मात्र अजून ऊस दर सुद्धा जाहीर करण्यात आला नाही. दर जाहीर केल्याशिवाय कारखान्यास शेतकऱ्यांनी ऊस देऊ नये, असे आवाहन यावेळी राघवेंद्र बिराजदार यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेत धर्मराव पुजारी, नागनाथ बिराजदार , पंचलिंग पाटील, सोमनाथ बिराजदार आदी उपस्थित होते.

# वैराग नगरपंचायतीसमोर गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा इशारा

## ग्रामपंचायत व नगरपंचायत काळात खर्च झालेल्या शासकीय निधीच्या कामाची चौकशी करण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वैराग/प्रतिनिधी : वैराग येथे नगरपंचायतीसमोर गेल्या आठ दिवसापासून माजी पंचायत समिती सदस्य संपत धेंडे यांचे आमरण उपोषण सुरू आहे . वैराग ग्रामपंचायत व नगरपंचायत काळात खर्च झालेल्या शासकीय निधीच्या कामाची चौकशी व्हावी आणि कर्मचारी नियुक्ती बाबतच्या प्रश्नावर त्यांचे उपोषण सुरू आहे . मात्र अद्याप शासन स्तरावर आंदोलनाची दखल घेतली जात नसल्याने त्यांनी गुरुवारी नगरपंचायत समोरील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा इशारा वैराग पोलीस ठाण्याला दिलेल्या निवेदनात जिल्हाधिकारी यांना दिला आहे .

वैराग (ता बार्शी) येथिल माजी तालुका पंचायत समिती सदस्य संपत धेंडे यांनी ३ डिसेंबर पासून आमरण उपोषण सुरू केले आहे . उपोषणाच्या दहाव्या दिवशी गुरुवार १२ डिसेंबर रोजी पहाटे वैराग नगरपंचायत कार्यालयासमोर झाडाला फाशी घेऊन आत्महत्या करणार असल्याचे त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे .

वैराग ग्रामपंचायतीचे कर्मचारी नगरपंचायतीकडे सामावून घेण्यासाठी बोगस कागदपत्रे व्दारे शासनाने १८ पदे मंजूर केली व २९ पदे भरली . ज्या कर्मचाऱ्यांना नेमणूक न देता डावलले त्यांना सामावून घ्यावे म्हणून पहिले आमरण उपोषण सोलापूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दहा दिवस केले . त्यानंतर वैराग नगरपंचायतीसमोर १८ दिवस, पुन्हा सहा दिवस, आणि चौथ्यांदा ३ डिसेंबर पासून सध्या आमरण उपोषण सुरू आहे.

तसेच वैराग ग्रामपंचायत काळात २०१८ ते २०१९ मध्ये ग्रामपंचायतीने एक कोटी ५४ लाख रुपयाचा तर चालू काळात वैराग नगरपंचायतीने ४ कोटी ५२ लाखाचा भ्रष्टाचार केल्याचा निवेदनात आरोप करत त्यांनी चौकशी करण्याची मागणी केली आहे . वैराग ग्रामपंचायतीच्या काळात व वैराग नगरपंचायत झाल्यापासून सुमारे तीन वर्षाच्या काळात एकूण महसुलापैकी २२.५% रक्कम दलित वस्तीसाठी खर्च न करता कागदोपत्री मेळ घालून ते पैसे हडप केल्याचा आरोप देखील त्यांनी केला आहे .

मी दहा वर्ष ग्रामपंचायत सदस्य , दहा वर्ष बार्शी पंचायत समितीचा सदस्य तसेच बार्शी तालुका शासकीय समिती , सोलापूर जिल्हा शासकीय समीती मध्ये काम केले आहे. माझी जर न्याय मिळविण्यासाठी अशी अवस्था होत असेल तर सर्व सामान्याची काय अवस्था होत असेल असा सवाल त्यांनी निवेदनात उपस्थित केला आहे .



वैराग (ता . बार्शी ) नगरपंचायतीसमोर माजी तालुका पंचायत समिती सदस्य संपत धेंडे सुमारे नऊ दिवसापासून उपोषणास असलेले दिसत आहेत .

माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करून योग्य ती कारवाई न केल्यास गुरुवारी माझ्या आत्मदहनाला नगर पंचायतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह तक्रारी अर्जातील सर्व अधिकारी जबाबदार राहतील असे निवेदनात म्हटले आहे .

याबाबत निवेदनाच्या प्रती ई मेल व्दारे त्यांनी मुख्यमंत्री , बार्शीचे माजी आमदार, पुणे विभागीय आयुक्त यांना दिल्या आहेत.

# अंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे यश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन कराटे स्पर्धेत येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वयत्त महाविद्यालयाने घवघवीत यश प्राप्त केले. ही स्पर्धा व्ही.जी शिवदारे कॉलेज आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स सोलापूर येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत विद्यापीठातील एकूण १४ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या चार विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता. आणि त्या चार ही विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

६१ किलो वजनी गटात सृष्टी पवार बीए भाग तीन हिने प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यामुळे तिचे चेन्नई येथे होणाऱ्या ऑल इंडिया वेस्ट झोन कराटे स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर ५० किलो वजन गटात रितेश शिंदे याने प्रथम क्रमांक प्राप्त केला. , ५५ किलो वजन गटात अतुल चव्हाण याने तृतीय क्रमांक प्राप्त केला., ५५ किलो वजन गटात आदित्य चव्हाण याने चौथा क्रमांक प्राप्त केला.

या सर्व यशस्वी स्पर्धकांचे अभिनंदन प्राचार्य डॉ.सी. जे खिलारे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईक नवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे . शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.

# शिक्षणाचे कर्तबगार खरे फुले दाम्पत्येच आहेत : डॉ. सुकेशिनी बोरकर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/बाराभाटी : महाराष्ट्र राज्य व देशाच्या इतिहासात महिला शिक्षकाचे अलौकीक कार्य राष्ट्रपिता महात्मा फुले व सावित्रीबाई फुले आहेत. महिलांना सन्मानाचे स्थान संविधानाच्या बळावरच आणि फुले दाम्पत्य यांचेच उपकार आहेत हे विसरता कामा नये. म्हणून शिक्षणाचे कर्तबगार खरे फुले दाम्पत्येच आहेत. प्रतिपादन डॉ बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूरच्या प्रा. डॉ.सुकेशिनी बोरकर यांनी केले. त्या नाटकाचे उद्घाटक म्हणून बोलत होत्या.

### नाट्य प्रयोगाचा उद्‌घाटन समारंभ

यावेळी मंचावर सभापती यशवंत परशुरामकर यांच्या अध्यक्षतेखाली जि. प. सदस्य श्रीकांत घाटबांधे, घनश्याम धामट, अतुल बंसोड, रत्नदीप दहिवले, रविंद्र खोटेले, शिला उईके, चद्रकला ठवरे, परेश उजवणे, दिलवर रामटेके, दादा संग्रामे, हरिदास कुंभरे आदी मान्यवर उपस्थित होते.

दरवर्षी प्रमाणे फ्रेन्डस नाट्य कला मंडळ हे मंडई व नाट्य प्रयोग आयोजित करीत असते. ही परंपरा गेल्या अनेक वर्षापासून जपत आहे. यावर्षी सदर गावातील रंगमंचावरील अनेक सांस्कृतिक कार्यक्रम सादरीकरनाचा ५० वा वर्षे आहे.

नाट्यप्रयोगाचे संचालन किशोर शंभरकर यांनी करून प्रास्ताविक दहिवले केले तर आभार उमेश बोरकर यांनी मानले. नाट्य मंडळाच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य केले.

# लासलगाव येथे महिलांच्या आरोग्यासाठी जनजागृती शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : लासलगाव येथील हॉटेल लिबर्टी फुड पॉईन्ट येथे वी आर मोर. कंपनी तर्फे महाराष्ट्राचे पॅडमॅन विकास धनराज गोपाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत.महिलांच्या आरोग्य साठी जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक बिझनेस कोच दिनेश शिंदे म्हणाले की.. वी. आर .मोर. हि. सेवाभावी संस्था महिलाच्या मासिक पाळी व गर्भाशयाचे आजार याविषयी गेल्या पाच वर्षापासून देशभर जनजागृती चे काम करत असून....

सध्याच्या धावपळीच्या युगात महिलांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यातील महत्त्वाचा प्रश्न म्हणजे ? महिलांचे सक्षमीकरण आणि सबलीकरण

पण या विषयात प्रत्येकाला वेळेवर पुरेसे मार्गदर्शन मिळत नसल्याने अनेक महिलांमध्ये कुवत आणि क्षमता असूनही त्या आपले कर्तुत्व सिद्ध करण्यास कमी पडतात हीच गोष्ट लक्षात घेऊन महिलांच्या या समस्या दूर करण्यासाठी.

वुई.आर.मोर. सोल्युशन कंपनीचे सी.एम. डी. विकास गोपाळ व एम.डी. प्रिया कड यांनी वुई. आर .मोर. नावाची संस्था स्थापन करून महिलांना संघटित केले. छ.शिवाजी महाराज, क्रांतीज्योती महात्मा फुले आणि सावित्री बाईंनी स्त्री शिक्षणासाठी जीवाचे रान केले. तसेच कार्य विकास धनराज गोपाळ करीत आहेत. शहरापासून खेडेगावातील वाडी, वस्ती पर्यंतच्या शेवटच्या महिलेला

निरोगी व सुदृढ आरोग्य मिळण्यासाठी आरोग्य विषयक समस्यांचा निपटारा करण्याकरता संपूर्ण देशभरात महिलांमध्ये जनजागृती चे काम करीत असून आज एक लाख प्लस महिलांना स्वतःच्या रोजगारातून आर्थिक उत्पन्नाची हमी मिळवून दिली. तर निरोगी आरोग्यासाठी दरमहा २० लाखाहून अधिक महिला सॅनिटरी नॅपकिनच्या वापरकर्त्या आहेत. गर्भाशयाचे आजार.गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी उत्तम गुणवत्तेचे फूड सप्लीमेंट आणून भविष्यात कर्करोगाचे समुळ उच्चाटन व मधुमेहाचे समुळ उच्चाटनासाठी काम करणार आहे ,विकास धनराज गोपाळ यांनी नासिक मधील जवळपास ३० हजार महिला वापरकर्त्या असल्याने त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून नासिक मधील द्वारका सर्कल जवळ पखाल रोडवर एनडीसीसी बँकेच्या मध्यवर्ती कार्यालया शेजारी . कार्यालयाचे उद्घाटन कंपनीच्या एम. डी. सौ. प्रिया कड, सी.एम. डी. विकास धनराज गोपाल, यांच्या शुभहस्ते नुकतेच करण्यात आले. आहे भगूर, पिंपळगाव बसवंत, ओझर मिग, लासलगाव, चांदवड, मालेगाव, भडगाव, अमळनेर, देवपुर धुळे आदी ठिकाणी संस्था मार्गदर्शन




करण्यासाठी कटिबद्ध असल्याने प्रत्येक महिलेला स्वयंपूर्ण करून सदृढ आरोग्यासाठी हा मार्गदर्शन दौरा असल्याचे

प्रतिपादन कंपनीचे बिझनेस कोच दिनेश शिंदे यांनी केले ,यावेळी गोपाल भगत, वैशाली भगत,अनिता अहिरराव, विशाल अहिरराव, धनश्री पाटील, स्नेहल सोनवणे,प्राजक्ता बिरारी, अनिल बिरारी, नेहा सोनवणे, नितीन पगार, सोनाली पगार, जयश्री बोरसे, दिगंबर बोरसे, वंदना तिडके, आरोग्यदूत मुकुंद आव्हाड आदि उपस्थित होते.

## ७८ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

# माझ्या पुस्तकाला बेलिफाने हात लावला तर त्याला गोळी घालून ठार करीन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने १ डिसेंबर २०२४ ला संस्थेचे जनसंपर्क कार्यालय साकेतनगर येथे ७८ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न झाली.

या कार्यशाळेला उद्घाटन पर मार्गदर्शन करताना एड. अविनाश थिट्टे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पिढ्यानपिढ्या न संपणारा ठेवा लिखित स्वरूपात पुस्तकरुपाने दिला आहे. लाखो लोक एकत्र येऊन जे करू शकत नाही ते बाबासाहेबांनी आपल्या साठी केले आहे. जनतेच्या समस्या उघड्या डोळ्यांनी बघून प्रतिनिधी काही करीत नसतील तर त्यांना नेते का समजावे? फायदा घेण्यासाठी अठरापगड जाती




एकत्र येतात मात्र लढा देण्यासाठी कुणी एकत्रित येत नाहीत. ज्याच्यावर अन्याय होतो तोच विद्रोह करतो, इतर जण गप्प असतात कारण ते विचारांशी बांधील नसतात. भंतेजींची राजनैतिक भूमिका योग्य नाही त्यांनी विनयशीलता पाळावी.

याप्रसंगी गोविंद कांबळे म्हणाले की, बहुतांश भंतेजींची चारिका बंद झाली असून प्रापंचिक आधारावर पैसा गोळा करतात. त्यांनी मार्ग दाखविणे अपेक्षित आहे. मिलिंद बागूल म्हणाले की, राखीव मतदारसंघातून निवडून गेलेले प्रतिनिधी अवैज्ञानिक कामासाठी मंदिराला दहा दहा लाख दान करतात, हे कितपत संयुक्तीक आहे? डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, मोळी विकून शिक्षण घ्यावे असा संदेश असताना विद्यार्थी आता पुस्तके वाचतच नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे फक्त पुस्तके हीच संपत्ती होती. प्रतीक पंचशील म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बौद्धिक क्षमतेवर अपार प्रेम होते. मनुस्मृती ही समस्यांचे माहेरघर आहे. गुंड प्रवृत्तीचे अमानवीय लोक त्यांचा प्रचार प्रसार करतात. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, पुस्तके हेच आपले गुरू आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले साहित्य वाचणारा व्यक्ती गुरगरल्याशिवाय राहणार नाही. भारताचे संविधानावर बुद्ध धम्माचा प्रभाव आहे, म्हणून आपण बुद्धिझमचा अंगिकार केला पाहिजे. एड. डी. व्ही. खिल्लारे म्हणाले की, डॉ. आंबेडकर ग्रंथ वेडे होते. ते ज्ञानाचे महामेरू होते.

प्रमुख वक्ते साप्ताहिक लोकप्रसारचे कार्यकारी संपादक प्रवीण रणयेवले म्हणाले की, बेरोजगारी वाढत असताना युवकांनी व्यवसायात येऊन रोजगारात स्थिरावले पाहिजे. देश खड्डयात जायला, शिकली सवरलेली माणसेच जबाबदार आहेत. मात्र आपण सजग राहून, ज्ञानाचा वापर करून पुढे गेले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, विद्येची श्रीमंती महान असते म्हणून पुस्तके वाचून, समजून, अंमलबजावणी केली पाहिजे. १२ डिसेंबर १९३८ ला मुंबई येथील अस्पृश्य विद्यार्थी संमेलनात बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आपल्या अंगी वसत असलेल्या गुणांचा परिपोष होऊन त्यास गोड फळे यावीत, हेच आपले ध्येय असावे. तसेच बायका पोरांपेक्षा ज्याचे विद्येवर जास्त प्रेम आहे. त्यालाच विद्येची गोडी लागली असे समजावे. आणि माझ्या घरावर सावकारी बद्दल जप्ती आली तर बेलिफाने माझ्या पुस्तकाला हात लावला तर त्याला मी गोळी घालून जागच्या जागीच ठार करीन. यावरून बाबासाहेब कसे ग्रंथ वेडे होते? हे आपल्या लक्षात येते. म्हणून आपण पुस्तके व वर्तमानपत्रे तीच वाचली पाहिजेत ज्यात केवळ न्यूज नव्हे! तर परिवर्तनवादी व्ह्युज प्रतिबिंबित असतील जेणेकरून भारताचे संविधान यांवर आधारीत आधुनिक समाज उभा करता येईल. मैदानात उतरले पाहिजे ही अपेक्षा रास्त आहे. पण वैचारीक फौज कुठे आहे? याचाही शोध घेतला पाहिजे. कुणावर दोषारोपण करण्यापेक्षा उपाय योजनावर बोलले पाहिजे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकराप्रमाणे १८-१८ तास अभ्यास करून समस्यांवर मार्ग शोधले पाहिजेत. त्यांच्या प्रमाणे ग्रंथालये निर्माण केली पाहिजेत.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन एड. विलास रामटेके यांनी केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, एड. विलास रामटेके, विनय कोळपकर, एड. अविनाश थिट्टे, प्रवीण रणयेवले, डॉ. व्ही. एच. कांबळे, प्रतीक पंचशील, उद्योजक मिलिंद बागूल, एड. डी. व्ही. खिल्लारे, आशा दामोदर खिल्लारे, गोविंद कांबळे, इंजिनिअर किशोर पाटील इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...





### गणेश भेंगडे यांना विधान परीषदेवर घ्या : सुधाकर गिते

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/ राहुल साबळे : महाराष्ट्र भाजपा किसान मोर्चा चे प्रदेश अध्यक्ष मा.गणेश तात्या भेंगडे यांना विधानपरीषदेवर संधी घ्यावी अशी मागनी भाजपा किसान मोर्चा चे प्रदेश सहसंयोजक सुधाकर गिते यांनी एका निवेदनाव्दारे केली आहे मुख्यमंत्री देवेद्रजी फडणवीस व भाजपा प्रदेश अध्यक्ष मा.चंद्रशेकरजी बावनकुळे साहेब यांची भेट घेणार असल्याचे त्यानी सांगीतले भेंगडे कुटुब जनसंघापासुन तर आजपर्यंत एकनिष्ट आहे मा.गणेशतात्या भेंगडे या अगोदर भाजयुमो प्रदेश कार्यकारणी मध्ये काम केले तळेगाव दाभाडे चे सतत १५ वर्ष नगरसेवक होते विरोधी पक्षनेते होते गटनेते होते पुणे जिल्हा भाजपा जिल्हा अध्यक्ष म्हणुन त्यानी उत्तम जबाबदारी पार पाडली पुणे जिल्ह्यात खुप मोठी पक्ष संघटना तयार केली आता भाजपा किसान मोर्चा प्रदेश अध्यक्ष झाल्यापासुन केंद्र सरकार राज्य सरकार च्या शेतकऱ्यां साठी असलेल्या विविध योजना शेतकऱ्यां पर्यत पोहचवण्या साठी शेतकऱ्यांना माहीती देण्यासाठी मा.भेंगडे साहेबानी ३ वेळा संपुर्ण महाराष्ट्रात दौरा केला त्यामुळे संपुर्ण महाराष्ट्रातील भाजपा किसान मोर्चा च्या संपुर्ण पदाधिकारी यांची मा.गणेश तात्या भेंगडे यांना विधान परीषदेवर आमदार म्हणुन संधी घ्यावी अशी मागनी आहे त्यासाठी आम्ही संपुर्ण प्रदेश पदाधिकारी मुख्यमंत्री देवेद्रजी फडणवीस साहेब व प्रदेश अध्यक्ष मा.चंद्रशेकरजी बावनकुळे साहेब यांची भेट घेणार असल्याचे सुधाकरराव गिते यांनी सागीतले.

### मागील भांडणाच्या रागातून दोघांना मारहाण

सोलापूर : मंगळवेढा तालुक्यातील मनेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या पाठीमागे मागील भांडणाच्या रागातून गोरक्ष शिंदे व इतर पाच जणांनी मिळून मारहाण केल्याने राजू महादेव इंगोले व पूजा महादेव इंगोले (वय-१८,रा.मानेवाडी,ता.मंगळवेढा) हे दोघे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटल येथे दाखल केले.

### दोन वाहनांची समोरासमोर धडक दोघे जखमी

सोलापूर : सोलापूरहून चारचाकी वाहनांतून मुलाकडे जाताना सावळेश्वर टोलनाच्या जवळ कृष्णाई हॉटेल समोर समोरून आलेल्या चारचाकी वाहन (क्रमांक एम.एच.१५.एफटी.८६३२) या वाहनाने पाठीमागून धडक दिल्याने नरसिंह पंढरी डावखरे (वय-७६ रा.नांदुरगा,जि.धाराशिव) हे जखमी झाले.उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटल येथे दाखल केले.

# प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत ॲग्रिस्टॅक योजनेची माहिती पोहोचवावी : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## कृषी क्षेत्रातील डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यापर्यंत जलद गतीने पोहोचवण्यासाठी ॲग्रिस्टॅक योजना महत्त्वपूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी) : राज्यातील कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरीत्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरिता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक ही योजना राज्यात राबविण्यात मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात ही योजना अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात येणार असून त्यासाठी सर्व शासकीय यंत्रणेने या योजनेची माहिती तळागाळातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवावी असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित ॲग्रिस्टॅक योजनेच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, केंद्रशासन ही योजना राबवत असून राज्य शासनाने ही कृषी क्षेत्रातील डिजिटल सेवांचा वापर करून शेतकऱ्यांना अधिक जलद सुविधा देण्यासाठी ॲग्रिस्टॅक ही योजना राज्यात राबवण्याचा निर्णय घेतलेला आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री), शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांची माहिती संच (क्रॉप सोन रजिस्ट्री) व शेतांचे भू संदर्भिकृत (जिओ रेफरन्स लँड पार्सल) यांचा माहिती संच एकत्रितरित्या तयार करणे व तो सातत्याने अद्यावत करणे या बाबी अंतर्भूत असल्याचे त्यांनी सांगितले.

त्यामुळे जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, तलाठी व ग्राम सेवक यांनी या ॲग्रिस्टॅक योजनेची प्रथम स्वतः सविस्तर माहिती घेऊन जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत या योजनेची प्रचार प्रसिद्धी करावी. जेणे करून प्रत्यक्ष योजना सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांकडून आवश्यक असलेली माहिती जलद गतीने प्रशासनाला उपलब्ध होण्यास मदत होईल, असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सुचित केले. तसेच या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्ह्यातील सर्व संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून त्याकरता त्यांचे सर्व डिटेल्स घेण्यात येणार आहे, असे ही त्यांनी सांगितले.

केंद्र शासनाची ही ॲग्रिस्टॅक योजना एक पथ पथदर्शक प्रकल्प म्हणून बीड जिल्ह्यात यापूर्वीच राबविण्यास सुरुवात झालेली आहे. ही योजना केंद्र शासनाची महत्त्वपूर्ण योजना असून राज्य शासनाने ही योजना राज्यात अत्यंत प्रभावीपणे राबविण्यात बाबत सूचित केलेले आहे. त्यामुळे प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी अत्यंत कार्यक्षमपणे पार पाडून कृषी क्षेत्रातील डिजिटल सेवांचा वापर शेतकऱ्यांना कृषी योजनांचा लाभ देण्यासाठी व्हावा यासाठी आवश्यक असलेली माहिती अत्यंत बिनचूकपणे शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या ॲप मध्ये भरावी असे निर्देश ही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिले. ही योजना संपूर्ण राज्यात १६ डिसेंबर २०२४ पासून मिशन मोडवर सुरू होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी ग्री स्टॅग या योजनेविषयी माहिती दिली. त्यानंतर बीडचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी ऍग्रीस्टॅक योजना बीड जिल्ह्यात कशा पद्धतीने राबविण्यात आली. तसेच ही योजना काय आहे व प्रत्यक्ष अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यामध्ये कशा पद्धतीने काम काज करावयाचे आहे याविषयीची अत्यंत सविस्तर माहिती ऑनलाईनद्वारे दिली.

या बैठकीस सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार, सर्व गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी हे दूरदृश्य प्रणाली द्वारे उपस्थित होते.

## जिल्हा सत्र न्यायालयच्या वरिष्ठ लिपीकपदी उमेश बिराजदार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील बोरी उमरगे येथील एका गरीब कुटुंबात जन्मलेल्या उमेश मल्लिकार्जुन बिराजदार यांची जिल्हा सत्र न्यायालय, सोलापुर येथे वरिष्ठ लिपीक या पदावर नियुक्त करण्यात आल्याने ग्रामस्थ वतीने जल्लोषात स्वागत करण्यात आले.

मल्लिकार्जुन बिराजदार हे अत्यंत गरिबी परिस्थितीतून नवी मुंबई येथील भाजी मंडई मध्ये मिळेल ते काम करून उमेश व महेश या दोन्ही मुलांना उच्च शिक्षण दिले. एक मुलगा अक्कलकोट पोष्ट खात्यात कार्यरत असून आत्ता उमेश हे जिल्हा सत्र न्यायालय, सोलापुर येथे वरिष्ठ लिपीक या पदावर नियुक्त झाल्याबद्दल उमरगे या पंच क्रोशीतील जनतेने खुप अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## परभणी संविधान अवमान प्रकरणातील आरोपीवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करावे : सैदप्पा झळकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/प्रतिनिधी : परभणीत महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळील संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान हा निषेधार्ह असुन संविधानचा अवमान प्रकरणातील आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावे.अशी मागणी रिपब्लिकन पक्षा(आठवले)चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केली आहे.

आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना पुढे म्हणाले की,आम्ही आंबेडकरी जनता बाबासाहेबांच्या संविधानाचा अपमान खपवून घेणार नाही.संविधानाचा अवमान करण्याऱ्या आणी या प्रकरणा मागील सूत्रधार कोणीही असूदे त्या आरोपीवर कठोरातील कठोर कारवाई करावी अशी मागणीही रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केली आहे.

परभणीतील संविधान अवमान घटनेप्रकरणी आरोपीवर कठोर कारवाई तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करुन या मागचा सुत्रधार शोधण्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व रिपाइं चे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले भाग पाढावे,संविधानाचा अवमान करणे हा अत्यंत गंभीर आणि राष्ट्रद्रोही गुन्हा आहे.या प्रकरणी तातडीने लक्ष द्यावे.या प्रकरणातील आरोपीला अटक झाली आहे.आंबेडकरी जनतेच्या भावना तीव्र आहेत.निषेध आंदोलनातुन त्या भावना व्यक्त झालेल्या आहेत.त्यामुळे आता आंबेडकरी जनतेचे सहनशीलतेचा अंत पाहू नये.अशा वक्तव्य देखील यावेळी श्री सैदप्पा झळकी यांनी या वेळी व्यक्त केली आहे.

## डुंगे ग्रामपंचायतच्या सरपंच पदी लक्ष्मी पाटील बिनविरोध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : भिवंडी तालुक्यातील डुंगे ग्रामपंचायतच्या सरपंच पदी लक्ष्मी गणेश पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. विद्यमान सरपंच जयश्री मधुकर पाटील यांनी आपसात ठरल्याप्रमाणे त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांच्या रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी घेण्यात आलेल्या निवडणुकीत लक्ष्मी पाटील यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने पिठासीन निवडणूक अधिकारी रेखा पाते यांनी लक्ष्मी पाटील यांची बिनविरोध निवड जाहीर केली.



पाटील यांची निवड जाहीर होताच त्यांच्या समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत एकच जल्लोष केला. गावकऱ्यांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी आपण पार पाडणार असून ग्राम विकासासाठी सदैव तत्पर राहणार आहेत अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित सरपंच लक्ष्मी गणेश पाटील यांनी दिली आहे.

## मदनवाडी येथे ग्रामपंचायतीच्या सदस्याला तलवार आणि लोखंडी रॉडने बेदम मारहाण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : मदनवाडी येथील ग्रामपंचायत सदस्य अतुल अंकुश देवकाते यांना गावातीलच आठ जणांनी पूर्ववैमनस्यातून तल- यार आणि लोखंडी रॉडने बेदम मारहाण केल्याची घटना सोमवारी संध्याकाळी घडली आहे. याप्रकरणी श्री. महादेव अर्जुन देवकाते राहणार मदनवाडी तालुका इंदापूर जिल्हा पुणे यांनी पोलीस स्टेशनला आठ आरोपीविरुद्ध फिर्याद दिली आहे. भिगवण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मदनवाडी ग्रामपंचायतीचे सदस्य अतुल अंकुश देवकाते आणि मारहाण करणारे काही आरोपी यांच्यामध्ये काही दिवसांपूर्वीच एका घटनेवरून मोठा वाद झाला होता. त्यावेळी एकमेकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आलेले होते. त्यामध्ये काही जण तुरुंगवास भोगून आले होते. त्याच वादातून पुन्हा सोमवारी (दि.९ डिसेंबर) मदनवाडी गावच्या हद्दीमध्ये अतुल देवकाते यांना आरोपींनी जीवे मारण्याच्या उद्देशाने तलवार, लोखंडी रॉड आणि खोऱ्याच्या दांड्याने जबर मारहाण केली आहे. त्यामध्ये त्यांच्या हात आणि पायांना फ्रेंक्चर झाल्याचे समजते. आरोपींविरोधात भिगवण पो लीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. १) शुभम राजेंद्र ढवळे २) अमित रावसाहेब देवकाते ३) आदित्य बाळासाहेब ढवळे ४) अविनाश बाळासाहेब ढवळे ५) पार्थ कैलास ढवळे ६) बाळासाहेब सर्जेराव ढवळे ७) राजेंद्र अर्जुन ढवळे ८) कैलास अर्जुन ढवळे सर्व राहणार मदनवाडी तालुका इंदापूर जिल्हा पुणे यांच्या विरोधात भारतीय दंड विधान कलम १०९,११८(१), १८९ (४), १९९१ (२) (३),१९०(१) यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास सा पोलीस निरीक्षक विनोद महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी अंमलदार पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील हे करीत आहेत.

### नळदुर्ग येथील सकल हिंदु समाजाची केंद्र सरकाराकडे मागणी

### पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना दिले निवेदन

# बांगलादेशात हिंदुवर होणाऱ्या अन्याय- अत्याचाराविरोधात केंद्र सरकारने तात्काळ पाऊल उचलावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : बांगलादेशात सध्या हिंदूंवर जो अन्याय, अत्त्याचार सुरु आहे त्याबाबत केंद्र सरकारने तात्काळ यामध्ये हस्तक्षेप करुन तेथील हिंदूंचे रक्षण करावे अशी मागणी नळदुर्ग शहर सकल हिंदु समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना देण्यात आले आहे.

बांगलादेशात हिंदूंवर होत असलेले अत्त्याचार तसेच मंदिरांवर होत असलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ नळदुर्ग येथे दि. १० डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. नळदुर्ग शहर सकल हिंदु समाजाच्या वतीने भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये हिंदु समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. हा मोर्चा आंबाबाई मंदिरा पासुन काढण्यात आला. मोर्चा अंबाबाई मंदिरा ापासुन निघाल्यानंतर नानीमाँ दर्गाह मार्गे माऊली नगर, राष्ट्रीय महामार्ग, संविधान चौक, लोकमान्य वाचनालय, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक, शास्त्री चौक, भवानी चौक, महात्मा बसवेश्वर चौक, चावडी चौक, क्रांती चौक मार्गे पोलिस ठाणा असा काढण्यात आला. या मोर्चामध्ये, सकल हिंदु समाजाचे गणेश मोरडे, राजकुमार गाढवे, अजय दासकर, अक्षय भोई,विजय ठाकुर, माजी नगरसेवक संजय बताले, बसवराज धरणे,नितीन कासार,विनायक अहंकारी,संजय विठ्ठल जाधव, सुधीर हजारे,नळदुर्ग शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पुदाले,भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, ऍड. धनंजय धरणे,शिवप्रतिष्ठानचे गजानन कुलकर्णी, शहर भाजपचे अध्यक्ष धीमाजी घुगे, विलास येडगे, सुहास येडगे, सागर हजारे,व्यापारी महासंघाचे सुभाष कोरे,पंचायत समितीचे माजी सदस्य साहेबराव घुगे,रवी पिस्के, अजय ठाकुर,श्रीकांत कुलकर्णी,अंकुश चिनकरे, सागर कलशेट्टी, संदीप गायकवाड यांच्यासह हिंदु बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.





**मोर्चात सहभागी झालेल्या हिंदु बांधवांनी बांगलादेशात हिंदूवर होत असलेल्या अत्त्याचार, अन्यायाच्या विरोधात तीव्र संताप व्यक्त केला असुन एक है, तो सेफ है हा नारा देत हिंदु बांधवांनी एकसंघ राहिले पाहिजे असे म्हटले आहे.हा मोर्चा पोलिस ठाण्यात आल्यानंतर मिर्चाचे विसर्जन करण्यात आले. यावेळी सकल हिंदु समाजाच्या वतीने पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मोर्चा जाणाऱ्या मार्गांवर पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता.**